**नियमित दिवाणी दावा क्र.१२१/२०१८ मधील नि.क्र. ५० वरील आदेश**
(CNR NO MHRG14-000553-2018)

१. सदरचा अर्ज वादीतर्फे वारसांनी त्यांना वादी हिराबाई रघुनाथ म्हात्रे यांचे वारस म्हणून दाव्यात सामील करण्याकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ यांनी म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, सदर वारसांनी ते वादीचे वारस असल्याबाबत आधारकार्ड, रेशनकार्ड वगैरे कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज हा योग्य नसून तो नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी हिराबाई रघुनाथ म्हात्रे या दि.१८/०१/२०२३ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. मयत वादी हिराबाई रघुनाथ म्हात्रे यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. वादीने सदरचा दावा हा ठरावाकरीता, साठेकरार दस्त क्र.१४५१/२००६, खरेदीखत दस्त क्र.३५५०/२००६ व दि.०८.०३.२००६ रोजीचे कुलमुखत्यारपत्र रद्द करणेकरीता व निरंतर मनाईकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. त्यामुळे वादी हिराबाई रघुनाथ

घरत यांचे अर्जात नमूद वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | वादींनी विहीत कालावधीत दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2023.04.05 11:22:47 +0530

ठिकाण – उरण
दिनांक – ३१/०३/२०२३

(निलेश म. वाली)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.